इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक – १ ■ वर्ष – ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव




शुक्रवार, ता. १ मे २०२६ | वैशाख शुक्ल १५ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२+८=२० | किंमत ₹ ५.००



# कुपनलिकांच्या खर्चावरून महासभेत विरोधक आक्रमक

## सभाध्यक्षांसमोर शिवशाहू आघाडीच्या नगरसेवकांनी मारला ठिय्या

**इचलकरंजी,ता.३०–**
**शहरातील कुपनलिकांच्या खर्चाबाबत महापालिकेच्या महासभेत सत्तारूढ आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. यासंदर्भात सभेचे अध्यक्ष तथा महापौर उदय धातुंडे यांनी सदर विषयावर चर्चा बंद करावी अशी सूचना केली. त्यावर आक्षेप घेत विरोधी शिव–शाहू आघाडीच्या नगरसेकांनी सभाध्यक्षाच्या समोरील जागेत ठाण मांडल्यामुळे वातावरण चांगलेच तापले. तर कचरा उठाव करणेसंबधात नागरिकांच्या तक्रारी वाढत असल्याने या विषयी संबधित मक्तेदाराचा ठेका रद्द करण्याच्या विषयावरून सभेत मोठा गदारोळ उडाला. विविध ३८ विषयांवर तब्बल सात तास चर्चा झाली.**

विविध ३८ विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी महापालिकेची सर्वसाधारण महासभा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात गुरूवारी पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी महापौर उदय धातुंडे होते.

सभेच्या सुरुवातीलाच विरोधी गट नेते उदयसिंग पाटील यांनी विषय पत्रिकेवरील सुरुवातीच्या अकरा विषया व्यतिरिक्त उर्वरित विषयांच्या टिपणीवर आक्षेप घेत त्या विषयांवर चर्चा करणे बेकायदेशीर ठरेल. त्यामुळे ते विषय पुढील सभेत घेण्याची मागणी केली. यावरून सत्ताधारी आणि विरोधकांच्यात पाऊण तास शाब्दिक वाद झाला. या



कुपनलिकांच्या खर्चावरून महासभेत आक्रमक झालेल्या शिव शाहू विकास आघाडीच्या नगरसेवकांनी महापौर यांच्या समोरील जागेत ठिय्या मारला. (छाया–मयूर चिंदे)

चर्चेनंतर नगरसेवक रणजीत जाधव यांनी वारंवार मागणी करूनही पाणी प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत सभात्याग केला.

ई बसच्या चार्जिंग स्टेशनचे काम रखडल्यावरून नगरसेवक तानाजी पोवार यांनी या कामाचा मक्तेदार भ्रष्टाचारी असल्याचा आरोप केला. उद्यान नामकरणावरुनही सत्ताधारी आणि विरोधकांच्यात चांगलीच जुंपली पण समझोत्याने चार विषय मंजूर करण्यात आले.

घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याच्या कामाच्या मक्तेदारा विरोधातील तक्रारीच्या विषयावर चर्चा करताना सर्वांनीच असमाधान व्यक्त केले.

महापौर उदय धातुंडे यांनी दोन सफाई कामगारांना सेवेत घेण्याबाबतच्या विषयावर चर्चा करून धोरणात्मक निर्णयासाठी ठराव शासनाकडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर वाचनालय फी आणि डिपॉझिट वाढीस विरोधकांनी विरोध केला. मात्र बहुमताने हा विषय मंजूर करण्यात आला. महापालिकेची वृक्ष समिती गठीत करण्याबाबत महापौरांना अधिकार देण्यात आले. परिवहन समितीचे सदस्य रुबन आवळे यांचा राजीनामा मंजूर करून त्या जागेवर नगरसेवक राजू पुजारी यांची नियुक्ती, खाजगी जागेवर कचरा साठवून ठेवणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करणे, कागल, जयसिंगपूर धर्तीवर शहरातील झोपडपट्टीधारकांना प्रॉपर्टी कार्ड देणे तर होर्डिंग लावण्याचा विषय पुढील मिटिंगमध्ये घेण्याचा घेण्याचा निर्णय झाला.

यावेळी झालेल्या चर्चेत सभागृहनेते विठ्ठल चोपडे, नगरसेवक प्रदीप धुत्रे, सयाजी चव्हाण, संजय तेलनाडे, संतोष शेळके, सचिन राणे, सुशांत कलागते अमर जाधव, राजू बोंद्रे, सौ.धृवती दळवाई, सौ.मनिषा नवनाळे आदि नगरसेवक, नगरसेविकांनी भाग घेतला.

### उद्यान पर्यवेक्षक बेलेकर यांना कार्यमुक्त करा

महासभेमध्ये उद्यान पर्यवेक्षक सुनील बेलेकर यांच्या कारभाराचा पाढा नगरसेवक तसेच नगरसेविकांनी वाचला. विविध कारणासाठी फोन केला असता ते फोन उचलत नाही. त्यांच्या कामासंदर्भात विविध तक्रारी आहेत, असे असतानाही मोठा पगार घेऊन त्यांना का कामावर ठेवले आहे, असा सवाल उपस्थित करून त्यांना कार्यमुक्त करून लोकांना काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी केली.नगरसेवक तानाजी पोवार यांनी सुद्धा सुनील बेलेकर यांच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत प्रशासनाने याबाबत भूमिका घ्यावी, अशी मागणी केली.

### अनेक विषयावरून खडाजंगी

विषय पत्रिकेवरील ३७ विषय तसेच ऐनवेळच्या विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी गुरुवारी झालेली सभा तब्बल सात तास झाली. त्यामध्ये अनेक विषयावर सत्तारूढ व विरोधकांमध्ये एकमत झाले तर काही विषयावर विरोधात चर्चा झाल्याने खडाजंगी उडाली. मॅरेथॉन चाललेल्या चर्चेमध्ये अनेक विषयांना मंजुरी देण्यात आली.

## स्वच्छता ठेक्यावरून खडाजंगी; ई बसच्या कामावरून नाराजी

### २९० कर्मचाऱ्यांच्या कंत्राटी भरतीची चौकशी करा

इंदौर धर्तीवर इचलकरंजी शहर स्वच्छतेच्या विषयावर बोलताना सत्ताधारी नगरसेवक रवी रजपुते यांनी गंभीर आरोप केला. सध्या कामाचे मक्तेदार कोण आहेत, हे बघा. नगरसेवकाआडून सुरू असलेली यंत्रणा थांबली पाहिजे. शहर स्वच्छ व्हायचे असेल तर नगरसेवकांनी प्रथम आचारसंहिता पाळली पाहिजे. नगरसेवकांनी कोणत्याही कामाचा मक्ता घेऊ नये अन्यथा ठरावाला काही अर्थ राहणार नाही, असे स्पष्ट केले. त्याचबरोबर त्यांनी इंदौर दौरा संपल्यानंतर २९० कर्मचाऱ्यांच्या कंत्राटी भरतीचे कोणी टेंडर भरले, याची चौकशी करावी अशी मागणी केली. याप्रसंगी उदयसिंग पाटील यांनी घंटागाड्यांची जीपीएस सिस्टीम सुरू करण्याची मागणी केली.

### दहन दफनासाठी ३५०० मंजुर

महानगरपालिकेच्या आजच्या महासभेत दहन–दफन निधीबाबत निर्णय घेण्यात आला. या योजनेसाठी साडेतीन हजार रुपये निधी देण्यास मंजूरी देण्यात आली. या संदर्भात नगरसेवक सुशांत कलागते यांनी मागणी केली होती.त्यावर महासभेत या विषयावर सकारात्मक चर्चा होऊन निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

### उद्याचा अंक बंद

आज १ मे कामगार दिनानिमित्त दैनिक महासत्ता कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या शनिवार दि.२ मे २०२६ रोजीचा अंक प्रसिध्द होणार नाही याची वाचक, अंक एजंट, विक्रेते व जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

– सर व्यवस्थापक

## गोकुळच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

### अध्यक्ष मुश्रीफ यांचे स्पष्टीकरण

**कोल्हापूर,ता.३०(प्रतिनिधी) –**
**मा. उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाच्या निर्णयामुळे गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे, असे स्पष्टीकरण दूध संघाचे अध्यक्ष नवीद मुश्रीफ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिले आहे. दरम्यान; श्री. महादेव सहकारी दूध संस्थेच्यावतीने उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात दाखल केलेली याचिका फेटाळली आहे.**



या पत्रकात श्री. मुश्रीफ यांनी पुढे म्हटले आहे, अंतरीम अवसायानातील १,१०८ दूध संस्थांपैकी काही दूध संस्थांच्या सुनावण्या पूर्ण होऊन त्यांचे निकालही दिलेले आहेत. अंतरीम अवसायानातील उर्वरित दूध संस्थांच्या सुनावणीची प्रक्रिया महाराष्ट्र सरकारने सादर केलेल्या शपथपत्राच्या अनुषंगाने ७० ते ७५ दिवसात पूर्ण करून तात्काळ निवडणूक कार्यक्रम घेण्याचे आदेश दिले आहेत.

गोकुळ दूध संघाच्या सभासद असलेल्या १,१०८ संस्थांनी दूध संघाची निवडणूक लवकरात लवकर घ्यावी म्हणून याचिका दाखल केली होती. आज त्याची सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने हे आदेश दिले आहेत. या आदेशात पुढे म्हटले आहे की, या १,१०८ दूध संस्थांचा मतदानाचा हक्क डावलू नये म्हणून नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार त्यांना संधी देण्यात यावी. त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य तो निर्णय घेऊन लवकरात लवकर कायद्यातील तरतूदीनुसार निवडणूक कार्यक्रम चालू करण्यात यावा.

### श्री महादेव दूध संस्थेची याचिका फेटाळली

### इराणचा घातक शस्त्र वापरण्याचा इशारा

**तेहरान,ता.३०–**
इराणने अमेरिका आणि इस्रायल विरुद्ध सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर एका नव्या आणि भीती निर्माण करणाऱ्या शस्त्राच्या वापराची उघड धमकी दिली आहे.

इराणी नौदल प्रमुख शहराम इरानी यांनी सरकारी माध्यमांशी बोलताना सांगितले की इस्लामिक गणराज्य लवकरच असे शस्त्र वापरणार आहे, ज्यामुळे शत्रू घाबरून जाईल.

## लव्ह जिहाद प्रकरणातील नराधमांना जेलबाहेर येऊ देणार नाही

### किरीट सोमय्या

**टोप,ता.३०( प्रतिनिधी)–**
शिरोली पुलाची (ता. हातकणंगले) येथील लव्ह जिहाद प्रकरणाने जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत माजी खासदार किरीट सोमय्या यांनी शिरोली गावास भेट देऊन प्रशासकीय कारवाईचा आढावा घेतला. अशा जिहादी माफियांना धडा शिकवण्यासाठी शासन आणि प्रशासन सज्ज असून, पीडित मुलीच्या चारित्र्याशी खेळणाऱ्यांना १५ वर्षे तुरुंगाबाहेर येऊ देणार नाही,असा आक्रमक पवित्रा सोमय्या यांनी यावेळी घेतला.

या भेटीदरम्यान सरपंच प्रतिनिधी कृष्णात करपे यांनी,ग्रामपंचायतीने आतापर्यंत केलेल्या कारवाईची माहिती दिली. सनदे आणि देसाई कुटुंबाचे घर व शेतातील पाणी, वीज बंद करून अतिक्रमण तातडीने काढण्यात आले. येत्या ग्रामसभेत या कुटुंबांना गावातून हद्दपार करण्याचा ऐतिहासिक ठराव करण्यात येणार आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटनांना आळा बसेल, असेही करपे यानी सांगितले.



शिरोली पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक यांची भेट घेवून किरीट सोमय्या यांनी चर्चा केली.

सोमय्या म्हणाले कि, एप्रिल महिन्यातच अशा चार घटना समोर आल्या आहेत. हे धर्मांतराचे एक मोठे षडयंत्र असून जिहादी माफिया हिंदू मुलींना लक्ष्य करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात भगव्या झेंड्याचा आणि हिंदू आया बहिणींच्या चारित्र्याचा अपमान करणाऱ्यांना या महाराष्ट्रात स्थान नाही.यासाठी मुख्यमंत्री फडणवीस सरकार या नराधमांना कठोर शासन करेल. तत्पूर्वी,सोमय्या यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी उपसरपंच विजय जाधव, तंटामुक्त अध्यक्ष सतीश पाटील, भाजप तालुकाध्यक्ष अमरसिंह पाटील, राजेश पाटील, कुमार पाटील, दीपक यादव, दीपक रानमाळे, अर्जुन चौगुले, दिलीप कौंदाडे, दिलीप शिरोळे, बाळू पाटील, संपत संकपाळ, ग्रामविकास अधिकारी गीता कोळी यांच्यासह ग्रामपंचायतीचे सदस्य आणि हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## यापुढे पवार विरुद्ध पवार निवडणूक नाही- सुप्रिया सुळे

**मुंबई,ता.३०–**
**महाराष्ट्रात २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पवार कुटुंबातीलच दोन सदस्य एकमेकांच्या विरोधात लढले होते. लोकसभेची निवडणूक जास्त चुरशीची ठरली होती. पण आता यापुढे पवार विरुद्ध पवार निवडणूक होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी जाहीर केली. त्या मुंबईत पत्रकारांशी बोलत होत्या.**



सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या की, बारामतीत गोविंदराव पवार आणि शारदाबाई पवार यांची जी नातवंड आहेत, पवार आडनावाची आहेत यांच्या विरोधात मी कधीही इलेक्शन लढणार नाही. दुसरा मतदार संघ बघेन, मला देशाची सेवा करायची आहे, जर दुसऱ्या कोणाची इच्छा असेल, तर मी दुसऱ्या मतदारसंघात काम करेन. हेही इलेक्शन मी लढले नव्हते, याही इलेक्शनचा खूपसा इतिहास आहे. जो आज सांगणे गरजेचे वाटत नाही. मागच्या वेळेस देखील तयारी आणि इच्छा बिलकुल नव्हती इथून पुढेही नसणार आहे, असेही त्या म्हणाल्या.

विधान परिषदेच्या निमित्ताने महाविकास आघाडीत झालेल्या घडामोडी आणि त्यासंदर्भात झालेले राजकारण बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, महाविकास आघाडी एका विश्वासाच्या प्रेमाच्या नात्याने संविधान वाचवण्यासाठी एकत्रित आलेली आहे. समंजस पद्धतीने तिन्ही पक्ष महाराष्ट्राच्या हितासाठी आणि देशाच्या हितासाठी काम करत आहेत, त्यामुळे ताटातलं वाटीत आणि वाटीतलं ताटात त्यापेक्षा जास्त काही नाही.

कुठल्याही कुटुंबाचा कर्ता पुरुष, व्यक्ती जेव्हा अचानकपणे जाते, ज्या भावना प्रत्येक घरात असतात, ते अर्थातच आमच्या घरात आहेत. एक फरक जाणवतो, आपण बाहेर जावून त्या भावना दाखवत नाहीत. आमच्या वडिलांची सर्वात मोठी खासियत आहे की, ते घरात आणि घराबाहेर सारखंच वागतात. ते कधीही स्वत:च्या भावना फारशा कुणाला दाखवत नाहीत आणि ते खूप कमी बोलतात. त्यामुळे त्यांच्या मनात काय चालले आहे हे फार कमी लोकांना जाणवत असते.

विलीनीकरणाचा विषय हा अजित दादांच्या मनात होता. आता अजित दादा नाही राहिले तर विषय राहिला कुठे? आता या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. अजित दादा माझा मोठा भाऊ आणि माझा नेतादेखील होता. अजित दादांना नेता आणि मोठा भाऊ हा सन्मान कालही दिला आणि उद्याही देणार आहे. दादा गेल्यानंतर खूप गोष्टी बदलल्या आहेत. त्यामुळे दादासोबतचे ते गोड नाते संपलेले आहे. त्यामुळे प्रत्येक जणाने आपल्या संघटनेत काय करायचे हा प्रत्येकाला सशक्त लोकशाहीत अधिकार आहे. प्रत्येकाने आपापले काम करावे. एवढीच अपेक्षा आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## काँग्रेसने उमेदवार न दिल्याने विधान परिषद निवडणूक बिनविरोध

**मुंबई,ता.३०–**
**येत्या १२ मे रोजी विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी निवडणूक होणार आहे. मात्र, ही निवडणूक आता बिनविरोध होणार आहे. दुपारी ३ वाजेपर्यंत या निवडणुकीसाठी फॉर्म भरण्याची वेळ होती. त्यानुसार, भाजपचे ५, शिवसेना शिंदे गटाचे २, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि महाविकास आघाडीचा प्रत्येकी एक उमेदवार अशा नऊ उमेदवारांनी आपले अर्ज भरले आहेत. कोणत्याही पक्षाने अतिरिक्त उमेदवार न दिल्याने आता ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे निश्चित झाले आहे.**

विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. विधान परिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार होते. दरम्यान, विधान परिषदेसाठी एकूण १० उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. तीन अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केला असला तरी त्यांना १० आमदारांची सूचक म्हणून सही नसल्याने या संबंधित अपक्ष उमेदवारांचे अर्ज बाद ठरवले जातील. पक्ष निहाय उमेदवार भाजपकडून सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे, प्रमोद जठार आणि प्रज्ञा सातव (पोटनिवडणूक), शिवसेनेकडून नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू, राष्ट्रवादी काँग्रेसकडून (अजित पवार गट) झिशान सिद्दीकी, शिवसेना ठाकरे गटाकडून (मविआ) अंबादास दानवे.

महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई आणि आमदार मिलिंद नार्वेकर यांच्या उपस्थितीत आपला फॉर्म भरला.

## शॉर्टसर्किटमुळे फ्लॅटला आग; प्रसंगावधानामुळे दुर्घटना टळली

**सांगली,ता.३०(प्रतिनिधी)–**
विजयनगर वॉर्ड क्र.८ मधील सैनिक नगर येथील पॅराडाईज पार्क अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील एका बंद फ्लॅटमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना घडली. मात्र स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली आणि सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला.

सदर फ्लॅटला कुलूप असल्याने आतून धूर आणि जळल्याचा वास येत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत त्यांनी तत्काळ मुख्य वीजपुरवठा (मेन स्विच) बंद केला. त्यानंतर पाण्याच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्यात आली. संभाव्य स्फोटाचा धोका टाळण्यासाठी गॅस सिलेंडरही सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आला. घटनेची माहिती मिळताच संबंधितांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाची गाडी व कर्मचारीही त्वरित दाखल होऊन परिस्थितीची पाहणी केली. सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित फ्लॅटचे वीज कनेक्शन बंद ठेवण्यात आले असून इतर फ्लॅट्सचा वीजपुरवठा पूर्ववत सुरू करण्यात आला आहे. या संपूर्ण घटनेत नागरिकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळली.

### प.बंगालमध्ये टीएमसीच येणार

## ममता बॅनर्जींनी फेटाळले एक्झिट पोलचे अंदाज

**कोलकाता,ता.३०–**
**पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यातील निवडणुकांबाबत आलेल्या एक्झिट पोलच्या अंदाजांना पूर्णपणे फेटाळून लावले आहे. या अंदाजांमध्ये तृणमूल काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात कडवी लढत दिसत असल्याचे सूचित करण्यात आले होते.**

निवडणुकीच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्याचे मतदान पार पडल्यानंतर, मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी गुरुवारी एक मोठा दावा केला की राज्यात पुन्हा एकदा 'मां–माटी–मानुष' सरकार स्थापन होणार आहे. ममतांनी एका व्हिडिओ संदेशाद्वारे सांगितले की त्यांचा पक्ष २९४ पैकी २२६ पेक्षा अधिक जागा जिंकून पुन्हा सत्तेत येईल. त्यांनी आपल्या संदेशात 'जय बांग्ला'चा नारा देत कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. तसेच त्यांनी विश्वास व्यक्त केला की जनतेचा पाठिंबा त्यांच्या पक्षासोबत आहे आणि निवडणुकीचे अंतिम निकालही त्याच दिशेने असतील. त्यांनी एक्झिट पोलवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे अंदाज भाजपच्या सूचनेनुसार प्रसारित केले जात आहेत, ज्यामुळे तृणमूल कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम

॥ शोकसंदेश ॥



श्री. राधेश्याम नंदकिशोरजी गजबी
हमारे बंधू श्री. राधेश्याम नंदकिशोरजी गजबी इनका स्वर्गवास बुधवार दि. २९/०४/२०२६ को हो गया है।
भगवान उनकी आत्मा को शांती प्रदान करें।

• शोकाकूल •
भाई– रमेशचंद्र, राजेंद्र, श्रीराम
पुत्र– आशिष गजबी
एवं समस्त गजबी परिवार, इचलकरंजी.


॥ चतुर्थ पुण्यस्मरण ॥



कै.श्री. मारूती धोंडिबा खामकर

पवित्र स्मृतींची ज्योत तेवते अखंड
आमच्या मनी सुगंध तुमच्या आदर्शाचा
दरवळतो जीवनी आठवुनी अस्तित्व
दिव्य तव कृती भारावली कृतज्ञतेने
आम्ही अर्पितो विनम्र आदरांजली !

प्रविण खामकर ✻ प्रेम खामकर
खामकर, नगरकर, पुरोहित परिवार


दैनिक महासत्ता वर्धापनदिन
व १ मे कामगार दिनास हार्दिक शुभेच्छा!
समरजित घाटगे
मा.श्री. करणसिंह फत्तेसिंह रणनवरे
संचालक- कागल दुध संघ, कागल
ता. कागल, जि. कोल्हापूर


१ मे कामगार दिनाच्या व दैनिक महासत्ताच्या
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
संस्थापक अध्यक्ष
मा. श्री. मिश्रीलाल जाजू
मो. ९८९०१४०८००
राष्ट्रवादी कामगार संघटना, इचलकरंजी.
सरचिटणीस- मदन मुरगुडे, मो. ९२२६३५७१६०


महाराष्ट्र शासन
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा!
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा...
१ मे
महाराष्ट्र दिनाच्या
आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in /MaharashtraDGIPR /MahaDGIPR
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री


मंगल देशा, पवित्र देशा,
महाराष्ट्र देशा..
प्रणाम घ्यावा माझा
हा महाराष्ट्र देशा..
१ मे
महाराष्ट्र दिन
व कामगार दिन तसेच
दैनिक महासत्ताच्या
वर्धापन दिननिमित्त
हार्दिक शुभेच्छा !
रविंद्र माने
जिल्हा प्रमुख, शिवसेना कोल्हापूर जिल्हा
नगरसेवक तथा गटनेते,
इचलकरंजी महानगरपालिका
शिवसेना


महाराष्ट्र शासन
म.रा.र.वि.म.
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.)
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
यशवंतराव चव्हाण मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग
'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा
महाराष्ट्राच्या प्रगतीचा
नवा अध्याय
मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला
एक्सप्रेस–वे आता अधिक
वेगवान आणि सुरक्षित.
मिसिंग लिंकसह अनुभवा वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवास
जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५मीटर)
लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा
६५०मीटर केबल–स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच रस्त्यावरील पूल पायलॉन उंची (१८२मीटर)
शुक्रवार, दिनांक ०१ मे २०२६
वेळ : दुपारी १२:३० वाजता
स्थळ– मिसिंग लिंक वरील पूल क्र.१, खोपोली एक्झिटजवळ, यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग, जि. रायगड.
महामार्ग विकासासाठी सदैव कटिबद्ध !
www.msrdc.in /msrdcofficial /Maharashtra State Road Development Corporation
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री
मेघना साकोरे–बोर्डीकर
राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम)

## ▪ संपादकीय ▪

**वस्त्रनगरी इचलकरंजी हे महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणून ओळखले जाते. समृद्ध आणि संपन्नतेचा वारसा असणाऱ्या या शहरामध्ये १ मे १९८५ रोजी स्वतंत्र विचारांचे, कष्टकरी कामगारांच्या समस्यांना वाचा फोडणारे, नागरी समाजाचे प्रश्न मांडणारे, आधुनिकता आणि परंपरांचा समन्वय साधणारे वृत्तपत्र म्हणून 'दैनिक महासत्ता'ने प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात प्रवेश केला. आज ४१ वर्षांची वाटचाल करून आपणा सर्वांचे हे लाडके दैनिक ४२ व्या वर्षांत पदार्पण करत आहे. या प्रदीर्घ प्रवासामध्ये वाचक, लेखक, हितचिंतक, जाहिरातदार, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते या सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे इवल्याशा या रोपट्याचा पाहता पाहता वटवृक्ष झाला. शहराच्या सीमा ओलांडून शेजारच्या कर्नाटक राज्यात, सांगली, कराड, साताऱ्यापर्यंत या दैनिकाने विस्तार केला. आधुनिक काळात इंटरनेट आवृत्ती प्रसारित झाली आणि जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेला मराठी माणूस दैनिकाशी जोडला गेला. बदलत्या काळात वृत्तपत्रे चालवणे कठीण होत चालले असतानाही समाजाला दिशा देण्यासाठी, सामान्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी 'दैनिक महासत्ता' अव्याहतपणाने आपला प्रवास करत आहे. आपणा सर्वांचे उदंड आणि निःस्पृह प्रेम उत्तरोत्तर विस्तारत जावे.**

# निकालाची प्रतीक्षा

अलीकडेच देशातील पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसाम या चार राज्यांमध्ये तसेच आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता ४ मे रोजी होणाऱ्या मतमोजणीची वाट पाहिली जात आहे. भारतासारख्या मोठ्या देशात सतत कोणत्या ना कोणत्या राज्यामध्ये विधानसभेची निवडणूक होतच असते. पण यावेळी ज्या राज्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया पार पडली आहे, ती राज्ये अत्यंत महत्त्वाची असल्याने देशातील आगामी राजकीय दिशा ठरवण्यासाठी या निवडणुकींचा निकालही महत्त्वाचा ठरणार आहे. विशेषतः पश्चिम बंगाल राज्यातील मतदारांनी कोणता कौल दिला आहे हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. आसाम आणि बंगाल वगळता इतर कोणत्याही राज्यामध्ये भाजपाचा फारसा प्रभाव नसल्याने केरळ, तामिळनाडूमध्ये भाजपची सत्ता येईल अशी सध्या तरी चिन्हे दिसत नाहीत. पण गेल्या विधानसभा निवडणुकीपासून भाजपाने पश्चिम बंगालवर लक्ष केंद्रित केले आहे आणि ७० पेक्षा जास्त जागा जिंकून आपले अस्तित्व दाखवून दिले होते. आता या निवडणुकीमध्ये आपण बहुमत पार करू असा विश्वास भाजपच्या नेत्यांना वाटत आहे, तर गेली अनेक वर्षे पश्चिम बंगालमध्ये राज्य करणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीसुद्धा या निवडणुकीमध्ये कसून संघर्ष केला आहे. पंधरा वर्षांच्या सत्ताधारी कारकिर्दीनंतर मतदारांमध्ये नाराजी निर्माण होणे किंवा सरकारविरोधी वातावरण निर्माण होणे साहजिक असते. त्याचा फटका यावेळी आपल्याला बसू शकतो याची काही प्रमाणात जाणीवही ममता बॅनर्जी यांना आहे. पण आपल्याला सत्तेपासून बाजूला करण्याइतपत यश भाजपाला मिळेल असे ममता बॅनर्जी यांना वाटत नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकेकाळी या राज्यात सत्तेवर असलेले कम्युनिस्ट पक्ष आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांची ताकद या राज्यामध्ये नगण्य आहे. साहजिकच या राज्यामध्ये फक्त भाजप विरुद्ध तृणमूल काँग्रेस अशीच लढत आहे. निवडणुकीच्या आधी राज्यामध्ये मतदार याद्यांची जी पुनर्रचना मोहीम हाती घेण्यात आली त्याचा काही परिणाम निकालावर होतो का हे पाहणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. गेल्या कित्येक विधानसभा निवडणुकांचा विचार करता यावेळी प्रथमच ९०% पेक्षा जास्त मतदान झाले आहे ही बाबसुद्धा लक्षणीय ठरणार आहे. मतदार याद्यांमध्ये नव्यानेच नावे दाखल केलेल्यांनी प्रथमच मतदान केले असेल, तर त्यांनी कोणाच्या पारड्यात मत टाकले हेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गेल्या अकरा वर्षांच्या कालावधीमध्ये त्यांना देशात सर्वात जास्त विरोध करण्याचे काम ममता बॅनर्जी यांनीच केले होते. मोदी यांना पर्याय म्हणूनच ममता बॅनर्जी यांच्या चेहऱ्याकडे विरोधी पक्ष पाहू लागले होते. या पार्श्वभूमीवर सुद्धा ही निवडणूक महत्त्वाची ठरणार आहे. या निवडणुकीमध्ये ममता बॅनर्जी यांच्या पक्षाने सत्ता राखली तर केंद्रीय पातळीवरसुद्धा ममता बॅनर्जी यांचे महत्त्व वाढणार आहे. कोणत्याही परिस्थितीत निवडणूक जिंकायचीच या रणनीतीने निवडणुकीच्या मैदानात उतरणाऱ्या भाजपाच्या नेत्यांनी या निवडणुकीच्या प्रचारासाठी कोणतीही कसर बाकी ठेवली नव्हती. मतदार यादी पुनर्रचना असो किंवा सुरक्षा दलांचा वापर असो किंवा निवडणुकी यंत्रणांचा वापर असो या मुद्द्यांचा वापर करून भाजपाने निवडणूक जिंकण्यासाठी सर्व काही शस्त्रे वापरली अशी चर्चा आतापासूनच केली जात आहे. ममता बॅनर्जी यांच्यासारखे आक्रमक नेतृत्व एका बाजूला आणि भाजपासारखा रणनीतीने निवडणूक लढणारा पक्ष एका बाजूला यांच्यातील राजकीय संघर्षात सर्वसामान्य मतदारांनी कोणाच्या पारड्यात कौल टाकला आहे हे ४ मे रोजी समजणार आहे.

# आखाती संघर्षाचे लोणचे

**आखातातील संघर्षात एकीकडे युद्धबंदीत बेमुदत वाढ करण्यात आली आहे तर दुसरीकडे होर्मुजची नाकेबंदी दोन्ही पक्ष करत आहेत. इराणकडून जहाजांना लक्ष बनविले जात आहे, मग प्रत्युत्तर म्हणून अमेरिकाही आपल्या नाविक दलाच्या आधारे नाकेबंदीसाठी पुढे सरसावत आहे. जहाजावरील हल्ल्यामुळे शांतता मार्गात बाधा उत्पन्न होणे साहजिक आहे. परंतु हे एक दबाव तंत्र आहे असे म्हटले जात आहे.**

दोन्ही पक्ष एकमेकांवर दबाव निर्माण करण्यासाठी करत असलेले प्रयत्न पाहता मग त्यातून शांतता कशी निर्माण होणार असा प्रश्न पडत आहे. ही सध्याची बेमुदत युद्धबंदी म्हणजे अमेरिकेने आपल्या युद्ध तयारीसाठी घेतलेली विश्रांती आहे की काय अशी शंकाही वाटू लागते, कारण डोनाल्ड ट्रम्प टप्प्याटप्प्याने लढाई करत आहेत आता आखाती युद्ध तिसऱ्या टप्प्यात प्रवेश करणार आहे. त्यापूर्वी चर्चेचे नाट्य पुन्हा रंगत आहे. डोंगर पोखरून उंदीर काढावा त्या पद्धतीने या चर्चेतून काही ठोस फलनिष्पत्ती होईल असे वाटत नाही. दोन्ही पक्ष शांततेच्या बैठकांमध्ये एकमेकांवर कुरघोडी करत असतील तर त्यातून ठोस प्रस्तावाला मान्यता मिळण्याची शक्यता कमीच आहे. कारण उपाध्यक्ष जेडी व्हॅन्स महोदय या चर्चेबाबत सकारात्मक दिसत नाहीत. तीन जहाजांवर हल्ले केले आहेत त्यामुळे शस्त्रसंधी नंतर ही सागरी संघर्षाचा भडका ओढण्याची दाट शक्यता दिसते. कारण होर्मुजच्या सामुद्रधुनीत इराणने तीन जहाजावर हल्ले चढविले या घटना शांततेला अपशकुन करणारे आहेत, असेच म्हटले पाहिजे. दोन्ही बाजूंना समजावून सांगण्यासाठी मध्यस्ताचा जो नैतिक प्रभाव लागतो तो पाकिस्तान पाडू शकत नाही, त्यामुळे दोन्ही पक्ष युद्धासाठी आमने-सामने उभे आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. डोनाल्ड ट्रम्प हे गोल्फपटू आहेत तसेच ते राजकीय बुद्धिबळ सुद्धा खेळतात. त्यांना आता इराणला चेकमेट द्यावयाचे आहे आणि आता पुढील ५४ दिवसानंतर त्यांना आखातांमधील राजकीय गोल्फमध्ये आक्रमक खेळ करून गोल करावयाचा आहे. डोनाल्ड ट्रम्प राजकीय बुद्धिबळाच्या पटलावर एक घर पुढे सरकत आहेत, आणि पुढील टप्प्यात इराणच्या राज्यकर्त्याला त्यांना




सत्तेवरून हटवायचे आहे आणि आपल्याला पाहिजे तसा माणूस सिंहासनावर बसवायचा आहे आणि त्याच्याकडून विपुल असा युरेनियम साठा तेल साठा यावर हुकमत निर्माण करावयाची आहे. पण इराण सुद्धा कच्च्या गुरुचा चेला नाही तो सुद्धा ट्रम्पला चांगल्या प्रकारे खेळवत आहे आणि युद्ध लांबवत आहे. युद्ध लांबवल्यामुळे अमेरिकेचे अर्थकारणावर राजकारणावर परिणाम होऊन ट्रम्प यांना लगाम बसेल असे इराणचे गणित आहे. अमेरिकेच्या युद्धविरामाविषयी इराणला विश्वास वाटत नाही. इराणला असे वाटते की थोडा विश्राम घेऊन पुन्हा अमेरिका आक्रमक बनू शकते. तूर्तास अमेरिकेने शांततेचे नाटक केले असले तरीही भविष्यात अमेरिका आक्रमक होऊन इराणला धूळ चारण्याचा प्रयत्न करेल असे भय वाटणे साहजिक आहे. प्रस्ताव आणि खलीते किती कलमाचे आहेत किंवा त्यामध्ये शांततेसाठी कोणकोणते निर्णय घेतले आहेत यापेक्षाही खरी गरज आहे ती प्रत्यक्ष अंमलबजावणीची, कृती कार्यक्रमाची. आजवरचा संघर्षाचा इतिहास असे सांगतो की भांडणाऱ्या दोन गटांमध्ये तडजोडीचे प्रयत्न तिसरा गट करतो तेव्हा त्यावेळी सुनिश्चित कलमे निर्णायक कालावधी आणि युद्धानंतरच्या पुनर्वसनाची ठोस योजना या तीन बाबीला विशेष महत्त्व असते. परंतु अमेरिका तिसऱ्या बाबतीत कमालीची गाफील आहे. इराणला हे माहीत आहे की युद्ध थांबल्यानंतर इराणचे पुनर्वसन कोण करणार हा खरा प्रश्न आहे. आजवर इराणने कृषी,उद्योग शिक्षण, आरोग्य,सामाजिक सुरक्षा अशा अनेक क्षेत्रात पायाभूत सुविधा गमावल्या आहेत. लोकजीवन उद्ध्वस्त झाले आहे हे सुरळीत कसे करावे याचा हा खरा प्रश्न आहे याबाबतीत

### दैनंदिनी

इराणचा आग्रह असेल की अमेरिकेने झालेले नुकसान भरून देण्यासाठी डॉलरचा ओघ वाढविला पाहिजे. ट्रम्प महोदय मोठे चतुर आहेत त्यांना हे माहित आहे की अमेरिकेला शत्रू पक्ष जर्जर करावयाचे आहे. यापुढे इराणने हिज्बुल किंवा हमास यांना पाठिंबा देऊ नये एवढी इराणची शक्ती दुर्बल किंवा कमजोर करण्यावर अमेरिकेचा भर आहे. इराणने मागे एकदा भारतीय जहाजावर गोळीबार केला त्याचा काहीही परिणाम झाला नाही. आता पुन्हा एक भारतीय जहाज अडविले आहे. इराणच्या या वाढत्या कारवाया पाहता त्याला वेळीच लगाम घालण्याची आवश्यकता आहे. युद्ध लांबले तर त्याचा प्रतिकूल परिणाम आखाती देशांच्या अर्थकारणावर होऊ शकतो. ताज्या माहितीनुसार या देशांचे १५ बिलियन पेक्षा अधिक नुकसान झाले आहे आणि तीन टक्के पासून १४% पर्यंत विविध देशावर विविध प्रकारे प्रतिकूल परिणाम दिसून येत आहेत, असा परिणाम कमी करण्यासाठी या सर्व आखाती देशांनी सावध पवित्रा घेऊन वाटचाल केली पाहिजे. भावी शांतता प्रस्ताव हा सर्वसमावेशक असावा. त्यामध्ये एकांगी असमतोल किंवा अतिशय युक्तकिंवा लाजणारी कोणतीही गोष्ट असू नये. ज्या ज्या वेळी युद्ध खर्च किंवा शांततेमध्ये अटी लादल्या जातात त्या-त्या वेळी कडवट प्रतिक्रिया उद्भवते. हे सर्व जर रोखावायचे असेल तर शांतता प्रस्ताव किती कलमाचा आहे यापेक्षा तो किती सखोल आहे, किती सर्वसमावेशक आहे, आणि शांततेला किती गती देणार आहे यावर त्याचे यश अवलंबून असणार आहे. त्यामुळे अमेरिका, इराण आणि मध्यस्थ या तिघांनी सुद्धा शांतता समतोल आणि सामोपचाराचा दृष्टिकोन ठेवून मार्ग काढला पाहिजे.



> महाराष्ट्रामध्ये एक मे पासून म्हणजेच महाराष्ट्र दिनापासून टॅक्सी, रिक्षा, ओला,उबेर यांच्या चालकांसाठी मराठी भाषा लिहिता, बोलता येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यामुळे भविष्यात चालकांना वाहन परवाना देताना किंवा नूतनीकरण करताना चालकाच्या मराठी भाषेचे ज्ञानही पडताळले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या या निर्णयामुळे राज्यात संमिश्र पडसाद उमटत आहेत. काहींनी या निर्णयाचे स्वागत केले तर, काहींनी नापसंती दाखवली आहे.

# महाराष्ट्रात व्हावा मराठीचा अंगीकार

२४ एप्रिल या दिवशी या निर्णयावरून मनसे कार्यकर्ते आणि हिंदी भाषिक यांच्यात वादावादीही झाली. मनसेने तर काही भागात रिक्षांवर मी मराठी बोलतो, मला मराठी भाषा येते, माझ्या रिक्षात बसा असे स्पीकर लावण्यास सुरुवात देखील केली आहे. थोडक्यात मराठी भाषा अनिवार्य करण्याचा विषय वादाकडे वळत आहे. मातृभाषेवरून वाद होणे हे ना महाराष्ट्रासाठी चांगले आहे ना देशाच्या एकतेसाठी चांगले आहे.

महाराष्ट्रात रिक्षा,टॅक्सी, ओला, उबेर यांच्या चालकांमध्ये अन्य भाषिकांची संख्या मोठी आहे. यातील बहुतांश चालक अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात मुंबईत राहतात. त्यांची ओळख ही मुंबईकर अशी झाली आहे परंतु अनेक चालक मराठीतून बोलणे टाळतात. अनेकदा प्रवासी मराठीत बोलत असूनही अन्य भाषिक चालक मराठी बोलण्याचे सौजन्यही दाखवत नाही त्यामुळे याची परिणीती वादात होते. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्यात आल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले. अनेक वर्षा पासून महाराष्ट्रात राहूनही तेथील मातृभाषा शिकून न घेणे हे चुकीचे आहे. जेथे आपल्या उदरभरणाची व्यवस्था होते त्या ठिकाणची मातृभाषा शिकणे हे रोजीरोटी साठी आवश्यक ठरते. परंतु त्याहीपेक्षा तेथील अस्मितेचा आदर करणे हे खरे राष्ट्रीयत्वाचे लक्षण आहे.प्रत्येकाने अन्य राज्यांच्या भाषेचा आदर करणे हे यातूनच घडू शकते. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे होत नाही हे दुर्दैव आहे. स्वभाषेची अस्मिता न बाळगणे आणि अन्य भाषांचा आदर न करणे यातूनच भाषिक वाद निर्माण होत आहे.

ज्या राज्यात राहतो तेथील मातृभाषेचा आदर कुणी राखत नसेल तर अशांना त्यांची जागा दाखवणे ही आवश्यक आहे. अनेक वर्ष महाराष्ट्रात रोजीरोटीसाठी राहणारे मराठी शिकले नाहीत यात मराठी भाषिकांचेही अपयश आहे. याचेही आत्मचिंतन मराठी माणसांनी करणे आवश्यक आहे अन्यथा भविष्यात मराठीची स्थिती आणखीनच दयनीय होईल.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. हा दर्जा मिळणे आणि तिची अस्मिता टिकवणे हे दोन्ही विषय भिन्न आहेत.मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे महाराष्ट्रात तिची अस्मिता जपली गेली,असे झालेले नाही. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर केंद्र शासनाकडून मराठी भाषेच्या प्रचार प्रसारासाठी निधी उपलब्ध होईल, अन्य राज्यातील विद्यापीठांमध्ये मराठी भाषेतून अभ्यासक्रम शिकवले जातील आणि महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर मराठी भाषेचे विविध कार्यक्रम सादर होतील, उपक्रम राबवले जातील.

परंतु मुळात महाराष्ट्रात राहणारा मराठी माणूस जोपर्यंत स्वतः मराठी भाषेविषयी अस्मिता बाळगणार नाही तोपर्यंत देशात अभिजात आणि महाराष्ट्रात दसरात अशी मराठीची स्थिती आहे. जे महाराष्ट्रात राहतात त्यांनी महाराष्ट्राप्रती आदर म्हणून मराठी बोलायला हवे यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही राजकीय पक्षांनी राजकारणा पलीकडे जाऊन भूमिका घेणे, हिंदी भाषिकांनी मराठीविषयी आदर बाळगणे आणि मराठी माणसाने मातृभाषेविषयी अस्मिता जपली, तर भाषावादाचा हा प्रश्न सुलभ होईल. राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली, तर अन्यांच्या मातृभाषेचा करा आदर करा हे सांगण्याची वेळच येणार नाही.

▮ लीना गाडगीळ

# जय जय महाराष्ट्र माझा

**१ मे १९६० रोजी स्थापना झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला आज १ मे ला ६६ वर्षे पूर्ण होत आहेत. आज महाराष्ट्र दिन साजरा करत असताना मनस्वी आनंद होत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळ असो वा स्वातंत्र्योत्तर काळ, महाराष्ट्राने नेहमीच विविध क्षेत्रांत देशाला दिशा दाखवली आहे.**

ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक, व्यापार, उद्योग, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, सांस्कृतिक, क्रीडा, पर्यटन, चित्रपट,



नाटक, संगीत, कला, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात संपन्न असलेल्या महाराष्ट्राने राष्ट्र उभारणीसाठी भरीव योगदान दिले आहे. उदाहरणार्थ देशपातळीवर राबवली जाणारी रोजगार हमी योजना ही महाराष्ट्रात प्रथम सुरु झाली होती. मात्र असे असले तरी या आनंदावर विरजण घालणाऱ्या सांप्रतच्या गोष्टींना नजरेआड करून चालणार नाही. कारण काळ जसजसा पुढे सरकतो आहे तसतशा राज्यात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. शेतकरी आत्महत्या आणि वाढत्या बेरोजगारीने उग्र स्वरूप धारण केले आहे. त्या सोडविण्यासाठी राज्याची कसोटी लागणार आहे. राज्यात ध्वनी, वायू, जल प्रदूषणाची समस्या मोठी असून सर्वच ठिकाणी नद्या, नाले मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरांकडे येणाऱ्या लोंढ्यांमुळे शहरांच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण पडत आहे. महिला अत्याचाराचा आणि एकूणच गुन्हेगारीचा आलेख वाढत आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन आज सहासष्ट वर्षांचा दीर्घ काळ उलटून गेला आहे, तरीही मराठी भाषेची सर्वत्र उपेक्षा होत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. खरे तर अनेक समस्यांचा डोंगर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यामुळे जय जय महाराष्ट्र माझा असे म्हणत असताना राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि सामाजिक समतेसाठी सर्वांनीच महाराष्ट्राच्या सद्य परिस्थितीची जाणीव ठेवली पाहिजे.

▮ प्रदीप मोरे

## वाचकांचा पत्रव्यवहार

# दैनिक महासत्ताची प्रेरणादायी वाटचाल

दैनिक महासत्ताने यशस्वितेची ४१ वर्षे पूर्ण करुन ४२ व्या वर्षात पदार्पण केले आहे.याप्रसंगी माझ्यासारख्या पत्र लेखकाला अत्यानंद होतो आहे.वृत्तपत्र क्षेत्रांतील ४१ वर्षाच्या अर्थात सुवर्ण महोत्सवाच्या वाटचालीकडे वळतांना 'दैनिक महासत्ता'च्या दैदिप्यमान कामगिरी निमित्त संपादक मा.श्री.वसंतराव दत्तवाडेसाहेब, यांच्यासह सर्वच टीमला खूप साऱ्या शुभेच्छा.आजच्या घडीला मोठं -मोठी वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके चालवणे खूप कठीण झाले असताना 'दैनिक महासत्ता' ने मात्र आपला रोख-ठोक बाणा,निर्भिड,अचूक वृत्तांकन कायम ठेवून वृत्तपत्र क्षेत्रामध्ये दबदबा निर्माण केला आहे.१ मे १९८५ रोजी या वृत्तपत्राचा प्रवास सुरू झाला.आज आपण जिथे कोठे असू तेथे एका क्लिकवर ऑनलाईन'दैनिक महासत्ता'चा अंक वाचण्यासाठी उपलब्ध होतो. त्यामुळे हा अंक लाखो वाचकांपर्यंत पोहचतो.आम्ही कर्नाटकातील बेळगांव जिल्ह्यामधील रहिवाशी असूनसुद्धा नियमित 'दैनिक महासत्ता'चा अंक वाचतो. 'दैनिक महासत्ता'मुळे नवोदित लेखकांना प्रोत्साहन देत लिहितं केलं जात आहे तर जेष्ठ साहित्यिकांना लिहिण्यासाठी व्यासपीठ मिळवून देण्याचे कार्य करण्यात येत आहे. 'दैनिक महासत्ता'ची मांडणी सुबक व आकर्षक असून मोहक वाटते. त्यामुळे या अंकातील बातम्यांसह लेख, कविता, मुलाखती,कथा, वाचनीय वाटतात. अंकातील भाषेचा दर्जा, शुद्धलेखन या साऱ्यांची कटाक्षाने दखल घेवून 'दैनिक महासत्ता'ने आपले वेगळेपण जपले आहे.कोरोना सारख्या नैसर्गिक आपत्तीत देखिल 'दैनिक महासत्ता'ने केलेली कामगिरी आपणाला नजरेआड करता येणार नाही. आगामी काळात देखील 'दैनिक महासत्ता'ची वाटचाल प्रेरणादायी ठरो हीच सदिच्छा !!

▮ राजू जाधव,मांगूर





# इचलकरंजीचा मानबिंदू - दैनिक महासत्ता

दैनिक महासत्ता ४२ व्या वर्षात पदार्पण करीत आहे.आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय, राज्यस्तरीय बातम्यांसोबत इचलकरंजीतील स्थानिक बित्तमबातम्या देणाऱ्या दैनिक महासत्ताचा अंक वाचूनच शहरवासियांच्या दिवसाची सुरुवात होते. या स्पर्धेच्या युगात दैनिक महासत्ताने राष्ट्रीय विचाराचे दैनिक म्हणून आपली यशस्वी घोडदौड कायम ठेवली आहे. स्थानिक दैनिक म्हणून इचलकरंजीकरांचे विशेष प्रेम आहे. महासत्तामध्ये सोमवारपासून रविवार पर्यंत दैनिकाबरोबर विविध पुरवण्यांसोबत वेगवेगळे सदर प्रसिद्ध होत असतात.शहरासह परिसरातील अनेक समस्यांविषयक ठळक बातम्या प्रसिद्ध होतात.याची दखल घेवून अनेक समस्यांची निराकरणही होत असते .

इचलकरंजीचा पाणी प्रश्न असो,इचलकरंजीचा रेल्वेचा प्रश्न असो, इचलकरंजीतील रस्ते,पाणी,नागरी कचरा समस्या व आरोग्य समस्या,यंत्रमागाचे प्रश्न,कामगारांचे प्रश्न,पंचगंगा प्रदूषण मुक्ती असो, हॉस्पिटलमधील प्रश्न असो, महापालिकेसंदर्भातील विविध प्रश्न असो अशा विविध विषयांवर सडेतोड बातम्या दैनिक महासत्तामध्ये प्रसिद्ध होत असतात . संपादकीय पान विशेष वाचनीय असते. तुषार पुरवणी संग्रहणीय असते रंगारंग पुरवणी ,आरोग्य पुरवणी, अर्थ जगत वाचनीय असतात . तसेच इचलकरंजी शहर व जिल्हा,कर्नाटक सीमाभाग तसेच राष्ट्रीय पातळी पर्यंत विविध समस्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम दैनिक महासत्ता करीत असतो म्हणूनच दैनिक महासत्ताने सर्वसामान्य वाचकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे.महासत्ता इचलकरंजीकरांचा जवळचा मित्र व आपलासा वाटतो . डिजिटल स्वरूपातही दैनिक महासत्ता दररोज जगभर वाचला जातो. इचलकरंजीचा मानबिंदू असणाऱ्या दैनिक महासत्ताच्या आज १ मे रोजी होणाऱ्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

▮ दीपक पंडित,इचलकरंजी

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार ता.१.५.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, उत्तरायणे, वैशाख मासे,वसंत ऋतो, शुक्ल पक्षे,पौर्णिमा तिथी,२२.५४ नंतर वैशाख कृष्ण प्रतिपदा,स्वाती नक्षत्र २८.३६ नंतर विशाखा नक्षत्र,तुला रास,सिद्धी योग २१.१४ नंतर व्यतिपात योग,विष्टी करण १०.०१ नंतर, बव करण २२.५४ पर्यंत दिनमान १२.३६,सुर्योदय ६.१२,सुर्यास्त १८.४८, (कोल्हापूरचे)राहू काळ सकाळी १०.३० ते १२, अन्वा महाराष्ट्र राज्य दिन, कामगार दिन,कुर्म जयंती, बुद्ध पौर्णिमा,श्रीशंकराचार्य पु.दि. नृसिंह नवरात्र,वैशाख स्नान समाप्ती,भद्रा १०.०१ पर्यंत, दैनिक महासत्ता वर्धापन दिन,सकाळी १० नंतर वस्त्रधारण,माल खरेदी,ओटी भरणेस,नांगर धरणे,बी पेरणे.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**– बोलण्यापूर्वी दोनवेळा विचार करा. तुमच्या बोलण्यामुळे अनावधानाने कुणाच्या तरी भावना दुखावल्या जातील. तुम्ही योग्य बचत करण्यात यशस्वी व्हाल.

**वृषभ**–कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो. त्यामुळे कामावर लक्ष विचलित होईल.उधार उसनवार देवू नका.

**मिथून**–तुम्ही सहजपणे समस्यांवर मात कराल आणि विजेते ठराल.प्रामाणिकपणा आणि झोकून देऊन काम करण्याची वृत्ती यामुळे तुमचे कौतुक होईल.

**कर्क**– आपल्या कामाबाबत आणि दृष्टीकोनाबाबत प्रामाणिक राहा. आपले दृढ निश्चय आणि कामातील कौशल्याची दखल घेतली जाईल..

**सिंह**–तुमच्या भांडखोर वागणुकीमुळे तुमचे शत्रू वाढतील. तुम्ही रागावाल असे वर्तन कुणी केले तरी तुम्ही तुम्ही रागावू नका. अनपेक्षित प्रवासामुळे धावपळ व ताणतणाव वाढेल.

**कन्या**–झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल.कामाच्या ठिकाणी आजचा दिवस खूप सुंदर असेल. आजच्या दिवशी अचूक संवाद हाच तुमचा महत्त्वपूर्ण गुण असेल.

**तुळ**– निव्वळ मजा, आनंद तुम्ही लुटू शकाल.आपल्यासाठी पैसा वाचवण्याची इच्छा पूर्ण होऊ शकते. आज तुम्ही योग्य बचत करण्यात यशस्वी व्हाल.

**वृश्चिक**–सांपत्तिक स्थिती सुधारली असली तरी तुमच्या योजना राबविण्यात अडचणी निर्माण करेल.गरजेच्या नसलेल्या वस्तुंवर पैसे खर्च करून तुम्ही जोडीदाराला अस्वस्थ कराल.

शहर स्वच्छतेच्या अनुषंगाने स्थायी समिती सभागृहात सर्व आरोग्य निरीक्षक व मुकादमांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बोलताना आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांनी शहरातील रस्त्यांवर कचरा साचल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. अशा स्थितीत संबंधित मुकादम व आरोग्य निरिक्षकांच्यावर जबाबदारी निश्चित केली जाईल. ज्या प्रभागात कचरा अधिक प्रमाणात आढळेल, त्या ठिकाणच्या मुकादमांवर थेट कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड यांनी सांगितले.



कोल्हापूर: आरोग्य निरीक्षक व मुकादमांच्या आढावा बैठकीत बोलताना आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड,शेजारी इतर अधिकारी.

डॉ. भारूड पुढे म्हणाले,शहर स्वच्छ राहिल्यास नागरिकांच्या तक्रारींमध्ये ५० टक्क्यांनी घट होईल. तुम्ही काम व्यवस्थित केले नाही तर नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागते. आरोग्य निरीक्षकांनी केवळ कार्यालयात न बसता प्रत्यक्ष भागात फिरती करुन काम करावे असे निर्देश दिले. आठवड्यामधील सहा दिवसात आपले काम व्यवस्थित पार पाडणे गरजेचे आहे. आपले शहर स्वच्छ व सुंदर कसे होईल हि आपली जबाबदारी आहे. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडणे गरजेचे आहे. मुकादमांनीही कर्मचाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करावे. नागरिकांच्या व सदस्यांच्या तक्रारी ज्या दिवशी कमी होणार त्यावेळी आरोग्याचे काम चांगले झाले असे म्हणता येईल.शहर स्वच्छ व सुशोभिकरण कसे होईल यावर सर्वांनी भर दिला पाहिजे.सध्या १५७५ कर्मचारी स्वच्छतेसाठी आहेत. आणखीन नविन लाडपागे कमिटीच्या शिफारशी अंतर्गत कर्मचाऱ्यांची नियुक्ती लवकरच होणार आहे. यामध्ये महापालिकेच्या हद्दीत आलेल्या तावडे हॉटेल ते गांधी नगरच्या एरियामध्ये आता आपल्याला स्वच्छता सुरु करायची आहे. त्यामुळे नव्याने नियुक्त काही कर्मचाऱ्यांची या ठिकाणी नियुक्ती केली जाईल.मे महिन्यात स्वच्छ सर्वेक्षण सुरू होत असून, त्यात कोल्हापूर शहराने पहिल्या तीनमध्ये स्थान मिळविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ,उपआयुक्त परितोष कंकाळ, सहाय्यक आयुक्त विजय पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार तसेच सर्व विभागीय आरोग्य निरीक्षक व मुकादम उपस्थित होते.

## पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे मंगळवारी आयोजन

कोल्हापूर,ता.३०(प्रतिनिधी)–

..............................

**जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर, कोल्हापूर सेंटर आणि अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन, वाठार यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, ५ मे रोजी सकाळी १० ते दु.२ या वेळेत अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन, वाठार (ता.हातकणंगले) येथे नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे.**

खासगी उद्योजकांकडून सुमारे ३०० पेक्षा जास्त रिक्तपदे या रोजगार मेळाव्याकरिता कळविण्यात आलेली आहेत. या पदांकरीता किमान १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा, बी.ई तसेच कोणत्याही शाखेतील पदवीधर पात्रता असणारे उमेदवार पात्र असणार आहेत.इच्छुक उमेदवारांनी rojgar.mahaswayam.gov.in आणि ncs.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन आपले पसंतीक्रम ऑनलाईन नोंदवावेत. प्रत्यक्ष मुलाखतीला येताना उमेदवारांनी आपली सर्व शैक्षणिक कागदपत्रे, आवश्यकतेनुसार रिझ्युमच्या ३ प्रती सोबत आणाव्यात.जास्तीत जास्त उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त जमीर करीम यांनी केले.



उन्हाळी शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

## न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उन्हाळी शिबिराचा समारोप

कोल्हापूर,ता.३०(प्रतिनिधी)–

..............................

**संभाजीनगर येथील न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित १५ दिवसीय उन्हाळी शिबिराचा अत्यंत उत्साहात समारोप झाला. या शिबिरात विद्यार्थ्यांनी क्रीडा, कला आणि साहसी उपक्रमांचा मनसोक्त आनंद लुटला.**

शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी फुटबॉल, क्रिकेट, पोहणे, अश्वारोहण आणि रायफल शूटिंगचे धडे गिरवले. तसेच लाठी–काठी, श्लोक पठण आणि योगासनांद्वारे भारतीय संस्कृतीची ओळख करून घेतली. मसाई पठार येथील ट्रेकिंग आणि व्हर्टिकल गार्डनची सहल या शिबिराचे मुख्य आकर्षण ठरले.झुंबा,ॲरोबिक्स आणि आर्ट अँड क्राफ्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळाला.मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक केले, तर पर्यवेक्षक जाधव यांनी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. क्रीडा शिक्षक विनायक शिंदे आणि स्नेहल दिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर यशस्वी झाले. शिबिरार्थींना प्रमाणपत्रे आणि त्यांनी स्वतः बनवलेल्या वस्तू भेट म्हणून देण्यात आल्या.



जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीच्या बैठकीप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड व अन्य अधिकारी.

## प्रलंबित अत्याचार प्रकरणांचा वेळेत निपटारा करा-राठोड

कोल्हापूर,ता.३०(प्रतिनिधी)–

..............................

**जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला.त्यांनी प्रलंबित प्रकरणांचा विहीत मुदतीत निपटारा करण्याचे आवाहन केले.**

बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस विभागाला प्रलंबित प्रकरणे निर्धारित मुदतीत न्यायालयात सादर करण्याच्या सूचना दिल्या. पोलीस तपासावर असलेल्या २२ प्रकरणांपैकी ८ प्रकरणांत दोषारोप पत्र दाखल झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत दाखल प्रकरणांमध्ये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेल्या पात्र प्रकरणांबाबत तसेच न्यायालयात प्रलंबित प्रकरणांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.या बैठकीस पोलीस उपअधिक्षक तानाजी सावंत, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन साळे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रेश्मा पाटील, पोलीस निरीक्षक पुष्पा किर्दत, जिल्हा समाज कल्याण अधिकारी पुष्कराज गर्दे, एलसीबी पथकाचे निवृती माळी, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रतिभा जाधव, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुहास वाईंगडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अभिजीत खोत तसेच संजय कांबळे व संतोष तोडकर उपस्थित होते.

## शिंपेत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

सरूड,ता.३०(प्रतिनिधी)–

..............................

**शाहूवाडी तालुक्यातील शिंपे येथे माजी मंत्री प्रकाश आवाडे क्रीडा व वैद्यकीय सेवा संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत फिरत्या दवाखान्याद्वारे आरोग्य तपासणी शिबिरास ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

मच्छिंद्र पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या या शिबिरास सायंकाळपर्यंत नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. शिबिरात मोफत सर्व प्रकारच्या आरोग्य तपासण्या तसेच विविध औषधांचेही विनामूल्य वितरण करण्यात आले. याप्रसंगी सरपंच सिंधुताई पाटील, उपसरपंच आनिशा काळे, डॉ. सुषमा पुजारी,डॉ.शिवानी जामदार, भरत तमायचे, विद्याताई लवटे, अनिकेत वावरे, अमोल कोरवी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# शक्तीपीठला एक इंचही जमीन देणार नाही

## ■ अजित पोवार यांचा इशारा;कोनवडेत निर्धार मेळावा ■

कुर,ता.३०(वार्ताहर)–

..............................

**राजकर्त्यांचे ढपल्यासाठी होऊ घातलेला शक्तीपीठ महामार्ग शेतकऱ्यांच्या एकजुटीने हाणून पाडून शेतकऱ्यांची एकही इंच जमीन या शक्तीपीठ महामार्गाला देणार नाही,असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हा अध्यक्ष अजित पोवार यांनी दिला.**

ते कोनवडे (ता.भुदरगड) येथील कोनवडे तसेच परिसरातील शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या निर्धार मेळाव्यात बोलत होते. अजित पोवार म्हणाले, हा शक्तीपीठ महामार्ग उंच आणि



कोनवडे:येथे शक्तीपीठ विरोधी निर्धार सभेत बोलताना स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष अजित पोवार,के.के.भारतीय व शेतकरी.

एक्सप्रेस हायवे असल्याने कोणताही उद्योग इथल्या स्थानिक लोकांना करता येणार नाही. या उंच रस्त्यामुळे राहिलेली शेती सुद्धा पूर परिस्थितीने बाधित होणार आहे.कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी हा ८५% हा अल्पभूधारक असल्याने येथील शेतकरी भूमिहीन होणार आहे. त्यामुळे एक इंचही जमीन या शक्तीपीठ महामार्गासाठी देणार नाही,असा निर्धार करूया.

यावेळी कॉम्रेड के.के. भारतीय म्हणाले, या महामार्गाचा उपयोग सर्व सामान्यांना न होता काही उद्योगपतींच्या इच्छेसाठी हा महामार्ग काबाड कष्ट करून उपजीविका भागवणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर लादण्यात येत आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने या महामार्गामुळे बाधित शेतकऱ्यांची आणि आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे.

यावेळी विलास पाटील, के. ए.पाटील एच.आर.पाटील यांनी गावागावात महामार्ग विरोधात जनजागृती करून शक्तीपीठ महामार्ग कदापि होऊ द्यायचे नाही,असे ठणकावून सांगितले.

## प्रगणकांना प्रशिक्षण

गारगोटी,ता.३०(प्रतिनिधी)–

**भारत सरकारकडून २०२६–२७ च्या जनगनणेसाठी व्यापक तयारी सुरु आहे. यावेळी प्रथमच मोबाईल ॲपचा वापर करून माहिती संकलित केली जाणार आहे. ता.१६ मे पासून घरयादी व घरगणना होणार असून जनगणनेसाठी घरी आलेल्या प्रगणकांना सहकार्य करावे, असे आवाहन भुदरगडच्या तहसीलदार डॉ.अर्चना पाटील यांनी केले आहे.**

दरम्यान, या जनगनणेसाठी भुदरगड तालुक्यात २७९ प्रगणक व ४४ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.या सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण गारगोटी येथील कर्मवीर हिरे महाविद्यालयात सुरु झाले आहे.

# मुरगूड येथे आज डायलिसिस केंद्राचे लोकार्पण

कोल्हापूर,ता.३०(प्रतिनिधी)–

..............................

**राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या आणि सहज उपलब्ध आरोग्य सेवा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सुरू केलेली 'महाडायलिसिस' योजना आता कोल्हापूर जिल्ह्यात अधिक विस्तारली जात आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील किडनी विकारग्रस्त रुग्णांसाठी १ मे पासून आरोग्य सुविधांचा नवा टप्पा सुरू होत आहे.**

१ मे २०२६ रोजी मुरगूड येथील ग्रामीण रुग्णालयात नवीन डायलिसिस केंद्राचे लोकार्पण आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

सध्या जिल्ह्यातील राधानगरी, कागल, आजरा आणि गारगोटी येथे ही सेवा उपलब्ध असून, आता मुरगुडमधील नव्या केंद्रामुळे परिसरातील रुग्णांची मोठी सोय होणार आहे.आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, येत्या मे महिन्यात जिल्ह्यातील गांधीनगर वसाहत रुग्णालय, शिरोळ, मलकापूर आणि चंदगड येथील ग्रामीण रुग्णालयांमध्येही महाडायलिसिस सेवा सुरू केली जाणार आहे. यामुळे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी शहरात येण्याची गरज भासणार नाही.

या केंद्रांमध्ये नेफ्रोलॉजिस्टच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित तंत्रज्ञ आणि कर्मचारी कार्यरत आहेत. या सेवेअंतर्गत रुग्णांना डायलिसिससह रक्त तपासणी, आवश्यक इंजेक्शन्स आणि आहार तज्ञांचा सल्ला मोफत दिला जातो. शासनाच्या विविध आरोग्य योजनांतर्गत पात्र रुग्णांना ही सेवा विनामूल्य उपलब्ध करून दिली जात आहे.

# मंत्री नितीन गडकरी यांची घाटगेंनी घेतली भेट

कागल,ता.३०(प्रतिनिधी)–

..............................

**नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांनी सदिच्छा भेट घेतली.भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर घाटगे यांनी गडकरी यांची घेतलेली ही पहिलीच औपचारिक भेट ठरली.या भेटीत उभयतांमध्ये विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली.**



विशेषतः कागलमधील प्रस्तावित पिलरवरील उड्डाणपूल, रस्त्यांची सुधारणा तसेच वाहतूक सुलभतेसाठी आवश्यक असलेल्या इतर अनुषंगिक बाबींवर तपशीलवार चर्चा झाली.

यावेळी गडकरी यांनी आपल्या बायोफ्युएल संकल्पनेचा पुनरुच्चार केला. शेतकरी हा केवळ अन्नदाता न राहता 'ऊर्जादाता' व्हावा,यासाठी साखर कारखान्यांनी सीएनजीसह इतर पर्यायी इंधन निर्मितीवर भर द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यासोबतच देशाच्या ऊर्जा स्वावलंबनालाही चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १/०५/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र चालाख हसिना
जबदस्त रोमँटीक हिंदी चित्र
दुपारी ७ वा.
प्यासी
A
प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
सेक्स अ‍ॅण्ड पॉलिटिक्स
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
शुक्रवार ता. १ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
book my show
पंचवटी वॉटसॲप ग्रुप
संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ सकाळी ११.३०
दुपारी ३ सायं. ६.३० व रात्री १० वा.







भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
शुक्रवार ता. १ पासून
रोज ४ खेळ *११.३० *३ *६.१५*९.३० वा.




कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
शुक्रवार ता.१ पा.
दु.१२ वा., दु.३.३० वा., सायं.६.३० वा.,





गुरु
शुक्रवार ता.१ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ४ खेळ ११.३०*३.००*६.३० व १० वा.




चित्रपट मोठा असलेने बदललेल्या खेळांच्या वेळा पहा.

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 book my show




" राजा शिवाजी " - मराठी ( U/A 16+ )
09:00 AM, 10:00 AM, 11:00 AM, 12:30 PM
01:30 PM, 02:30 PM, 04:00 PM, 05:15 PM
06:00 PM, 09:30 PM, 10:15 PM, 10:45 PM
" राजा शिवाजी " - हिंदी ( U/A 16+ )
07:30 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फॉर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11




राजा शिवाजी (MAR) (U/A)
08.15, 11.00am, 12.00, 01.00, 02.30, 03.30, 04.30, 06.00, 08.00, 09.30, 10.45pm
राजा शिवाजी (HIN) (U/A)
09.30am
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# कराडमध्ये शाळांकडून पुस्तक-वह्यांची सक्तीने विक्री

## पालकांवर आर्थिक ताण; शैक्षणिक साहित्य विक्रेता संघटनेकडून कारवाईची मागणी

कराड,ता.३०(प्रतिनिधी)–

**नवीन शैक्षणिक वर्षाच्या तोंडावर कराड शहर व परिसरातील काही शाळांकडून विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या पुस्तकं, वह्या आणि स्टेशनरीची थेट विक्री केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, पालकांना ठरावीक विक्रेत्यांकडूनच साहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी वाढू लागल्याने शैक्षणिक साहित्य विक्रेता संघटना आक्रमक झाली आहे.**



कराडचे गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे निवेदन देताना शैक्षणिक साहित्य विक्रेता संघटनेचे पदाधिकारी.

शिक्षण विभाग आणि उच्च न्यायालयाने यापूर्वीच शाळांमधून शालेय साहित्य विक्रीस स्पष्ट मनाई केली असतानाही काही ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याचे चित्र आहे. याविरोधात संघटनेने कराड गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे निवेदन देत संबंधित शाळांवर तातडीने कारवाईची मागणी केली आहे.या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी आणि शिक्षणमंत्र्यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, शाळांच्या परिसरात ठरावीक विक्रेत्यांना स्टॉल लावून पुस्तकांचे संच विक्रीस ठेवले जात आहेत. हेच साहित्य बाजारात कमी दरात सहज उपलब्ध असताना शाळांमधून ते वाढीव किमतीत विकले जात असल्याने पालकांवर आर्थिक बोजा पडत आहे. याशिवाय 'शाळेतूनच पुस्तके घ्या' अशी सक्ती केल्यामुळे पालकांपुढे पर्याय उरत नसल्याची खंतही व्यक्त केली जात आहे.

शिक्षण विभागाच्या सूचनांनुसार, कोणत्याही शाळेने राज्य मंडळ, किंवा इतरशालेय साहित्याची विक्री थेट शाळेत करू नये. तसेच पालकांना विशिष्ट दुकानदाराकडूनच खरेदी करण्यास भाग पाडणेही नियमबाह्य आहे. शाळांनी केवळ आवश्यक साहित्याची यादी जाहीर करावी; मात्र त्यात कोणत्याही विक्रेत्याचे किंवा प्रकाशकाचे नाव सक्तीने नमूद करू नये, असे स्पष्ट निर्देश आहेत.याचबरोबर, नवीन सत्र सुरू होण्यापूर्वी किमान दोन महिने आधी पुस्तकांची यादी जाहीर करण्याची सक्ती आहे, जेणेकरून पालकांना बाजारातील पर्याय पाहून योग्य दरात साहित्य खरेदी करता येईल. मात्र या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

संघटनेने इशारा दिला आहे की, शाळांकडून सुरू असलेली ही बेकायदेशीर विक्री तात्काळ थांबवली नाही, तर विद्यार्थ्यांच्या हितासाठी आंदोलन छेडले जाईल. तसेच शाळांनी आपल्या नावावरून कोणत्याही विक्रेत्याला साहित्य विक्रीची परवानगी देऊ नये, अन्यथा संबंधितांवर कारवाई होऊ शकते, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**पालकांनी सजग राहण्याचे आवाहन**

शाळांकडून होणाऱ्या सक्तीला बळी न पडता बाजारात उपलब्ध असलेले साहित्यच खरेदी करावे. शाळांमधून विकले जाणारे आणि बाजारातील पुस्तकांचा अभ्यासक्रम समानच असतो, त्यामुळे वाढीव किंमत मोजण्याची गरज नाही. जर कोणतीही शाळा जबरदस्ती करत असेल, तर त्याची तक्रार शिक्षण विभागाकडे करावी, असे आवाहन संघटनेने पालकांना केले आहे.

# सांगलीत घरफाळा वाढीविरोधात नागरिकांमध्ये नाराजीचा सूर

## सुनावणीशिवाय बिले काढल्याचा आरोप

सांगली,ता.३०(प्रतिनिधी)–

**भांडवली मूल्यावर आधारित घरपट्टी कर आकारणीविरोधात सांगली शहरात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, या पार्श्वभूमीवर स्वामी विवेकानंद ज्येष्ठ नागरिक संघाने बैठक घेतली. या बैठकीत वि.द.बर्वे यांनी महापालिकेला देण्यात येणाऱ्या निवेदनाचे वाचन केले. सुमारे ५४ हजार हरकती दाखल झाल्यानंतरही त्यावर सुनावणी न घेता थेट बिले काढण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.**

करारचनेत बदल करून करदर कमी करावेत, तसेच महासभेची मान्यता घेऊनच पुढील प्रक्रिया राबवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. बेकायदेशीर बांधकामांबाबत अभय योजना राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा वाढीव करामुळे असंतोष वाढेल, असेही मत व्यक्त झाले.



सांगलीः ज्येष्ठ नागरिक संघाच्या बैठकीत वाढीव घरफाळाबाबत माहिती देताना वि.द.बर्वे,शेजारी इतर मान्यवर.

तसेच क्षेत्रीय सभा नियमित घेतल्यास नागरिकांना आपल्या भागातील प्रश्न मांडता येतील, यावरही भर देण्यात आला. सूर्यवंशी यांनी घरपट्टी वाढीच्या संदर्भात मार्गदर्शन केले.

विशेष म्हणजे, या बैठकीस सत्ताधारी व विरोधी पक्षातील प्रत्येकी एका नगरसेवकांना आमंत्रित करण्यात आले होते; मात्र दोन्ही नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. या बैठकीस बाळासो मासुळे, विजयसिंह चव्हाण, सुरेश टेंगले, उत्तम कांबळे, प्रकाश वग्यानी, प्रेमचंद पांड्याजी,अनिल इनामदार, सतीश सूर्यवंशी, किशोर आसर, वसंत शिंदे, रामजीभाई पटेल आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते. दरम्यान, याबाबत महापालिकेचे आयुक्त, महापौर व स्थायी समिती सभापती यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती वि. द. बर्वे यांनी दिली.

# डोंगर पठारावरील टंचाईग्रस्त गावांमध्ये पाण्याचे टँकर सुरु

ढेबेवाडी,ता.३०(प्रतिनिधी)–

**उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईने रौद्र रूप धारण केले आहे. अनेक गावांतील पाण्याचे स्रोत आटल्याने नागरिकांची पाण्यासाठी वणवण होत होती. ही गंभीर परिस्थिती ओळखून बनपुरी (ता.पाटण) येथील जिल्हा परिषद सदस्या मृणाल पाटील यांनी त्यांच्या वडिलांच्या महेश इन्फ्राटेक कंपनीमार्फत डोंगर पठारावरील टंचाईग्रस्त गावांमध्ये मोफत पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले असून, यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

वाढत्या उष्णतेमुळे विहिरी आणि कूपनलिकांच्या पाणी पातळीत मोठी घट झाली आहे.



पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत होती. ही अडचण लक्षात घेऊन मृणाल पाटील यांनी तातडीने पावले उचलली.गावात पाण्याचा टँकर येताच नागरिकांनी समाधान व्यक्त केले. 'शासकीय टँकरच्या मंजुरीची वाट न पाहता लोकप्रतिनिधींनी स्वतःहून मदतीचा हात पुढे केल्यामुळे आमची पाण्याची चिंता मिटली आहे,' अशा भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

# प्रभावी संभाषण कौशल्ये विद्यार्थ्यांच्या उत्कर्षाला पूरक

## डॉ.हर्षदीप जोशी

सातारा,ता.३०(प्रतिनिधी)–

**भाषेवरील प्रभुत्व व संभाषण कौशल्य विद्यार्थ्यांच्या उत्कर्षाला पूरक ठरतात, असे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेचे सहसंचालक वित्त व प्रशासन विभागाचे प्रमुख डॉ.हर्षदीप जोशी यांनी व्यक्त केले.**

देगाव (ता.जि.सातारा) येथील गौरीशंकरचे सातारा कॉलेज ऑफ फार्मसी देगाव महाविद्यालयात 'ए आय हेल्थकेअर' या विषयावर आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमात बोलत होते. यावेळी संस्थेचे संचालक डॉ.अनिरुद्ध जगताप, डॉ.शितलकुमार पाटील,



राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम विजेते ठरलेली अपेक्षा चित्रे हिचा सत्कार करताना डॉ.हर्षदीप जोशी, समवेत डॉ.अनिरुद्ध जगताप, डॉ.नागेश अलुरकर, श्रीरंग काटेकर.

डॉ.नागेश अलुरकर, जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर, उपप्राचार्य डॉ.योगेश गुरव, सह निमंत्रक डॉ.सिमादेवी कदम आदी प्रमुख उपस्थित होते.

डॉ.हर्षदीप जोशी पुढे म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात भाषा संवादाला खूप महत्त्व प्राप्त होणार आहे. आपले मत, आपले विचार इतरांना सहजतेने पटवून देणे ही भविष्याची गरज भासणार आहे. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेमध्ये अपेक्षा चित्रे डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूर या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळवला तर प्रसाद राजगुरू श्रेयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च छत्रपती संभाजीनगर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांक प्रणोती धनवडे व आलिना कडवेकर कृष्णा कॉलेज ऑफ फार्मसी कराड या विद्यार्थिनींना विभागून देण्यात आला. स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र व रोख रक्कम अनुक्रमे तीन हजार, दोन हजार व एक हजार रुपये देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सह निमंत्रक डॉ.सिमादेवी कदम तसेच समन्वयक प्रा.फिरदोस शेख, प्रा. दिव्यांनी जाधव यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रांजली फडतरे व ज्ञानेश्वरी कार्वेकर यांनी केले. प्रा.दिव्यांनी जाधव यांनी आभार मानले.

# 'सह्याद्री'कडून ऊस बिलाची रक्कम बँक खात्यात वर्ग

कराड,ता.३०(प्रतिनिधी)–

**यशवंतनगर (ता.कराड) येथील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याने सन २०२५-२६ गळीत हंगामात कारखान्याकडे गळीतास आलेल्या ऊसास प्रति मे.टन ३५०० प्रमाणे ऊस बिलाची संपूर्ण रक्कम रूपये ३०४ कोटी ९ लाख, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केली असल्याची माहिती कारखाना प्रशासनाच्यावतीने देण्यात आली.**

सह्याद्री कारखान्याने सन २०२५-२६ गळीत हंगामात ८ लाख ६८ हजार ८३१ मे.टन ऊसाचे गाळप केले आहे, या संपूर्ण ऊसाची प्रति मे.टन ३५०० प्रमाणे ऊस बिलाची संपूर्ण रक्कम रूपये ३०४ कोटी ९ लाख ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केले आहेत. तसेच प्रतिदिन ७५०० मे.टनावरून ११००० मे.टन विस्तारवाढ प्रकल्प यशस्विरित्या कार्यान्वित केलेला असून, येत्या सन २०२६-२७ गळीत हंगामात नोंदविलेल्या संपूर्ण ऊसाचे गाळप करण्यासाठी आवश्यक ती ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा उभारणीचे काम सुरू आहे. तरी ऊस उत्पादकांनी नोंदविलेला संपूर्ण ऊस 'सह्याद्री'कडेच गळीतास पाठवावा, असे आवाहन कारखाना प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.



कराड : जिया करपे व समृद्धी इंगळे हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे, समवेत उपस्थित मान्यवर.

# सगाम कॉलेजमध्ये एनडीएत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

कराड,ता.३०(प्रतिनिधी)–

**येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमध्ये एन.डी.ए. परिक्षेमध्ये प्रथम प्रयत्नात देशांमध्ये द्वितीय रँक प्राप्त करून निवड झालेल्या जिया सचिन करपे आणि देशांमध्ये पंधरावी रँक प्राप्त करून निवड झालेल्या समृद्धी प्रवीण इंगळे यांचा सत्कार समारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे यांच्या हस्ते संपन्न झाला.**

यावेळी उपप्राचार्य एस. एस. नांगरे, आर.वाय.पाटील, एन.डी.ए. समन्वयक प्रा.सौ.अश्विनी पाटील,प्रा.शरद कचनकर, प्रा.डी. बी. किर्तकर, प्रवीण इंगळे, सचिन करपे हे उपस्थित होते.प्राचार्य खिलारे म्हणाले की, आजच्या सत्कारमूर्ती या तुम्हा विद्यार्थ्यांसाठी आयडॉल आहेत. या दोघींच्याकडून प्रेरणा घेऊन मोठी स्वप्ने बाळगा. अभ्यास करा, आणि एन.डी.ए.मध्ये निवड होण्यासाठी प्रयत्न करा. यावेळी जिया करपे आणि समृद्धी इंगळे यांनी आपले अनुभव व्यक्त केले. प्रास्ताविक आणि स्वागत प्रा.सौ.अश्विनी पाटील यांनी केले. यावेळी सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक,विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.सचिन चव्हाण यांनी तर प्रा.सौ.आर.ए.नवाळे यांनी आभार मानले.

# जिल्ह्यातील ८ खत विक्री परवाने निलंबित

## खतांच्या विक्रीत अनियमितता आढळल्याने कारवाई

सातारा,ता.३०(प्रतिनिधी)–

**खरीप हंगाम २०२६-२७च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कृषि निविष्ठा विक्रेत्यांवर कृषि विभागाने मोठी कारवाई करत ८ खत विक्री परवाने निलंबित केले आहेत. युरिया व इतर खतांच्या विक्रीत गंभीर अनियमितता आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली असून, शेतकऱ्यांच्या फसवणुकीला आळा घालण्याचा प्रशासनाचा स्पष्ट संदेश यामधून दिला गेला आहे.**

जिल्हा व तालुका स्तरावरील भरारी पथकांनी केलेल्या अचानक तपासणीत अनेक विक्रेत्यांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे उघड झाले. काही ठिकाणी खत विक्रीसाठी मशीनचा वापरच केला जात नव्हता, तर काही विक्रेत्यांकडे मशीनवरील साठा, प्रत्यक्ष साठा आणि नोंदवहीतील आकडे जुळत नव्हते. तसेच शेतकऱ्यांना पक्की बिले न देणे यासारख्या गंभीर बाबी देखील समोर आल्या.

प्रभारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अजय शेंडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना योग्य दरात खते व बियाणे मिळावीत आणि त्यांची अडवणूक होऊ नये, यासाठी जिल्हाभरात विशेष तपासणी मोहीम राबवली जात आहे. एप्रिल महिन्यातील तपासणीत दोषी आढळलेल्या १० विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली असून, त्यापैकी ८ जणांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेच्या कृषि विकास अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली भरारी पथके खते, बियाणे व किटकनाशक विक्री केंद्रांची अचानक तपासणी करत राहणार आहेत. खरीप हंगामात कोणताही गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. शेतकऱ्यांनी खते, बियाणे व औषधे खरेदी करताना नामांकित कंपनीचा आग्रह धरावा. पक्के बिल अवश्य घ्यावे, कोणतीही शंका किंवा फसवणूक झाल्यास त्वरित तक्रार नोंदवावी. तक्रार निवारण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून शेतकऱ्यांच्या तक्रारींसाठी पंचायत समिती व तालुका कृषि अधिकारी कार्यालयात नोंदवही ठेवण्यात आली आहे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी गस्त वाढवा

## पोलिस अधीक्षक तुषार दोशींच्या सूचना

सांगली,ता.३०(प्रतिनिधी)–

**जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्याबरोबरच वाढती नशेखोरी, गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी प्रभावी गस्त झाली पाहिजे, अशा सक्त सूचना नुतन पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांनी बैठकीत दिल्या. त्यांनी पदभार स्विकारल्यानंतर प्रथमच जिल्ह्यातील सर्व प्रभारी अधिकाऱ्यांची बैठक घेतली.**



पदभार स्विकारल्यानंतर नूतन अधीक्षक दोशी हे पोलिस क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने मुंबईला गेले होते. त्यांनी जिल्ह्यातील सर्व प्रभारी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कायदा आणि सुव्यवस्थेबरोबरच जिल्ह्यातील गुन्हेगारी पद्धतीचा आढावा घेतला. या बैठकीत अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्याच्या सक्त सूचना दिल्या. गुन्ह्यांचा तपास करून त्याचे दोषारोपपत्र न्यायालयात लवकर सादर झाले पाहिजे. दोष सिद्धीपर्यंत पोलिसांचे काम महत्वाचे आहे. त्यातूनच पोलिसांची प्रतिमा समाजात उंचावेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

वाढती नशेखोरी आणि गुन्हेगारीबाबत त्यांनी सक्त सूचना दिल्या आहेत. प्रत्येक बीट मार्शलची प्रभावी गस्त झाली पाहिजे. डार्क स्पॉटवर पोलिसांची नजर हवीच. नशेखोरांना वेळीच पोलिसी खाक्या दाखवला पाहिजे, अशा सूचनाही दोशी यांनी दिल्या. वाहतूक शाखेचा आढावा घेत असताना अपघातांची संख्या कमी झाली पाहिजे, यासाठी प्रबोधन आणि जनजागृती गरजेची आहे, असे त्यांनी सांगितले. यासह वाहतूक शाखेचे पोलिस रस्त्यावर दिसातात त्यांच्याकडून बेदरकार वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला पाहिजे,असे त्यांनी सांगितले.

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे विशेष पथक नियुक्त**

जिल्ह्यात चेनस्नॅचिंग, घरफोडीच्या घटना वाढत आहेत. त्यातील संशयितांच्या मुसक्या आवळल्या पाहिजेत, यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषणचे निरीक्षक संजीव झाडे यांच्या नेतृत्वाखाली खास पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकाद्वारे जिल्ह्यातील गुन्ह्यांचा छडा लावला जाणार आहे.

# सागरेश्वरहून १९ चितळांचे यशस्वी स्थलांतर

## अन्नसाखळी बळकटीसाठी झोळंबी येथे विशेष मोहीम

चांदोली,ता.३०(वार्ताहर)–

**सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रातील नैसर्गिक अन्नसाखळी बळकट करण्यासाठी आणि वाघांच्या वास्तव्यासाठी आवश्यक भक्ष्यांची संख्या वाढवण्यासाठी वन विभागाने मोठे पाऊल उचलले आहे. प्रे ऑगमेंटेशन प्रोग्राम अंतर्गत सांगलीच्या सागरेश्वर अभयारण्यातून १९ चितळांचे ढेबेवाडी वनपरिक्षेत्रातील झोळंबी येथे यशस्वी स्थलांतर करण्यात आले आहे.**

एप्रिल महिन्याच्या अखेरीस ही विशेष मोहीम राबवण्यात आली. यामध्ये ७ नर, ५ मादी आणि ७ पिल्ले अशा एकूण १९ चितळांचा समावेश आहे. विशेष वाहनांद्वारे सागरेश्वर ते झोळंबी असा लांबचा प्रवास करून या वन्यजीवांना सुरक्षितपणे आणण्यात आले.



झोळंबी येथे चितळांचे यशस्वी स्थलांतर करण्यात आले आहे.

सध्या या चितळांना झोळंबी येथील इनक्लोजर (बंदिस्त अधिवास) मध्ये ठेवण्यात आले असून, चांदोलीच्या वातावरणाशी जुळवून घेतल्यानंतर त्यांना नैसर्गिक जंगलात मुक्त करण्यात येणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार राबवण्यात आलेल्या या उपक्रमासाठी पुण्यातील रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट (बावधन) यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. ही संपूर्ण प्रक्रिया सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राचे क्षेत्र संचालक तुषार चव्हाण, चांदोली वन्यजीव विभागाच्या उपसंचालक स्नेहलता पाटील आणि सहाय्यक वनसंरक्षक संदेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

**व्याघ्र प्रकल्पातील जैवविविधता टिकवण्यासाठी आणि वाघांच्या कायमस्वरूपी वास्तव्यासाठी भक्ष्यांची संख्या वाढवणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने हे स्थलांतर महत्वपूर्ण ठरणार आहे.**

**अहोरात्र मेहनतीला यश**

वनपरिक्षेत्र अधिकारी किरण माने यांच्या नेतृत्वाखाली झोळंबीचे वनपाल काशिलिंग बादरे, वनरक्षक बळवंत चक्रधर आणि वनसेवकांच्या पथकाने अहोरात्र कष्ट घेऊन ही मोहीम फत्ते केली. स्थलांतरादरम्यान सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले असून, सर्व चितळे सद्यस्थितीत सुखरूप आहेत.

# छ.संभाजी महाराज स्मारकाच्या सुधारित आराखड्यास मान्यता

## ५२९.८७ कोटी मंजूर; मंत्री शिवेंद्रसिंहराजे यांची माहिती



सातारा,ता.३०(प्रतिनिधी)–

**शिरूर तालुक्यातील मौजे तुळापूर (बलिदान स्थळ) व वढू बुद्रुक (समाधी स्थळ) येथे उभारण्यात येणाऱ्या स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या विकास आराखड्यातील वाढीव कामांसह राज्य शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.**

शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या रुपये २८२.२४ कोटी किमतीच्या सुधारीत व विकास आराखड्यामध्ये आता रुपये २४७.६३ कोटी इतकी वाढ होऊन एकूण रुपये ५२९.८७ कोटी किमतीच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली आहे.

काही दिवसांपूर्वीच ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी वढू- तुळापूर येथे भेट देवून पाहणी केली होती. त्यानंतर विविध कामे करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निदर्शनास आणून सदर कामे मंजूर करून त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी ना.शिवेंद्रसिंहराजे यांनी केली होती.ना.शिवेंद्रसिंहराजे यांच्या मागणीनुसार ना. फडणवीस यांनी सदर प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून याबद्दल ना.शिवेंद्रसिंहराजे यांनी मुख्यमंत्री महोदय आणि राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

मूळ आराखड्यात सुधारणा करताना विविध पायाभूत सुविधा व अतिरिक्त कामांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ होऊन सुधारित आराखड्याची एकूण किंमत तब्बल ५२९.८७ कोटी रुपये इतकी झाली आहे. यामध्ये भीमा नदीवरील आपटी येथे पूल बांधकाम, रस्त्यांचे रुंदीकरण तसेच इतर पूरक सुविधांचा समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर रस्ता विकास, पूल, सांस्कृतिक ध्वज उभारणी, भूसंपादन यांसारख्या घटकांचे सादरीकरण करण्यात आले होते.

सुधारित आराखड्यानुसार आपटी ते वढू बुद्रुक रस्ता विकासासाठी सुमारे ७३ कोटी रुपये, १८ मीटर रुंदीचा पूल, ४५ कोटींचा व्ह्यूइंग डेक, ३० मीटर उंच भगवा ध्वज, पथदिवे, युटिलिटी शिफ्टिंग तसेच भूसंपादनासाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. एकूण सुमारे २३७ कोटी ६३ लाख रुपयांच्या कामांना स्मारकाच्या मुख्य घटकांत मान्यता देण्यात आली आहे. हा प्रकल्प जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून आपटी ते तुळापूर दरम्यान ग्रीनफिल्ड रस्ता विकसित केला जाणार आहे. तसेच पर्यटनवृद्धीच्या दृष्टीने स्थानिकांना गाईड प्रशिक्षण, गर्दी व्यवस्थापन आणि इतर सोयीसुविधा उभारण्यावरही भर देण्यात येणार आहे.

दैनिक महासत्ता वर्धापन दिनास

हार्दिक शुभेच्छा...







**मा.श्री. संजय पाटील (यड्रावकर)**



सत्य शब्दांचा खजिना....

**महासत्ता**

# मा. श्री. राजेंद्र पाटील - यड्रावकर

शिरोळ तालुक्याचे कार्यसम्राट आमदार

# यड्रावकर उद्योग समूह, कोल्हापूर जिल्हा

## शरद सहकारी साखर कारखाना लि., नरंदे (जि. कोल्हापूर)

कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी लि., यड्राव

पार्वती को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट लि., यड्राव, ता. शिरोळ

राजमाता जिजाऊ शेतकरी सहकारी सूतगिरणी लि., अमळनेर

पार्वती सहकारी सूतगिरणी लि., कुरुंदवाड, ता. शिरोळ

● चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक, सर्व सभासद व कर्मचारी ●





संस्थापक संचालक व माजी आमदार

स्व.डॉ. आप्पासाहेब ऊर्फ सा.रे.पाटील

दैनिक महासत्ता वर्धापन दिनास

हार्दिक शुभेच्छा...





मा.श्री.गणपतराव पाटील (दादा)

SHREE DATTA SHETKARI SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD. SHIROL

An ISO 9001 Certified Sugar Factory

# श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,शिरोळ

पोस्ट दत्तनगर, ४१६ १२०, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर, फोन (०२३२२) २३६५५१ (६ लाईन्स)
फॅक्स (०२३२२) २३६६००, E-mail:- klp.dattsssk@gmail.com



- आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून प्रतिदिन १२००० मे.टन ऊस गाळप क्षमतेचा साखर कारखाना, त्यामधील उपपदार्थापासून प्रतिदिनी ९० हजार लिटर्स क्षमतेचा औद्योगिक मद्यार्क निर्मिती उद्योग प्रतिदिनी १ लाख ३५ हजार लिटर्स क्षमतेचा इथेनॉल निर्मिती उद्योग.
- प्रेसमड बगॅस राखेमध्ये स्पेंटवॉश मिसळून उत्तम प्रतिचे कंपोष्ट खत निर्मितीचा प्रकल्प
- सामाजिक बांधिलकी आणि परिसरातील नागरिकांच्या वैद्यकीय सेवेकरीता अद्यावत/अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ञ असे आरोग्य केंद्र.
- देशातील सहकारी साखर कारखानदारीमध्ये को-जनरेशन (सहवीज निर्मिती) पद्धतीने वीज निर्मितीचा प्रकल्प कार्यान्वित करण्याचा पहिला मान.
- देशातील साखर कारखानदारीमध्ये तांत्रिक कार्यक्षमतेमध्ये सलग सहा वर्षे प्रथम पुरस्कार आणि विशेष प्रशंसा प्रमाणपत्र तसेच भारत सरकारकडून अतिउत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेबद्दल प्रथम पारितोषिक आणि विशेष प्रशंसा प्रमाणपत्र असे एकूण ६७ पुरस्कार प्राप्त कारखाना
- कारखान्याच्या पुढाकाराने शिरोळ तालुका व कार्यक्षेत्रात ३४६५ हेक्टर इतक्या क्षेत्रावरती क्षारमुक्त जमिन प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात आला आहे. तसेच सेंद्रीय ऊस शेती आणि सेंद्रीय साखरेचा अभिनव प्रकल्प यशस्वी केला आहे.
- कार्यस्थळावर, प्रदूषण नियंत्रणाबरोबरच परिसरातील शेतकऱ्यांना आदर्श व मार्गदर्शक ठरावा आसा निसर्गरम्य परिसर आणि आर्थिक उत्पन्न.
- तरूणांना वेगवेगळ्या प्रकारचे तांत्रिक शिक्षण देऊन, त्यांना स्वत:चा छोटासा उद्योग अगर अन्यत्र कोठेही काम मिळण्याच्या दृष्टीने औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, पॉलिटेक्निक व इंजिनिअरिंग कॉलेजची सोय.
- केंद्र सरकारच्या २० कलमी कार्यक्रमातील योजनेअंतर्गत सहकारी ग्राहक भांडार उपक्रमास प्रोत्साहन आणि महाराष्ट्र सरकारच्या धोरणाप्रमाणे झुणका भाकर केंद्र कार्यरत.

मा. श्री. गणपतराव आप्पासाहेब पाटील - मार्गदर्शक संचालक

श्री. एम.व्ही.पाटील - कार्यकारी संचालक | श्री. शरदचंद्र विश्वनाथ पाठक - व्हा.चेअरमन | श्री. रघुनाथ देवगोंडा पाटील - चेअरमन

